सत्यमेव जयते

# अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

बी-२०१/२०२ अर्जुन सेंटर, स्टेशन रोड, गोवंडी (पु) मुंबई- ४०० ०८८

समता न्याय एकात्मता

रजि नं.४३७६०३ Email Id- esta.arti@gmail.com website https://arti.org.in फोन नं. ०२२ - ४४५१५८५४/२५५००१९४/२५५००१९५

जा.क्र/आर्टी/योजना/CET/२०२५-२६/०२३३ दिनांक:- ०४/११/२०२५

## प्रसिद्धीपत्रक-१

**बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती आणि आर्टी द्वारे स्पर्धात्मक परीक्षा पूर्व-प्रशिक्षण योजना 2025-26 साठी आयोजित केलेल्या सामयिक प्रवेश परीक्षांमध्ये प्राप्त झालेले गुण पाहण्याची सोय उपलब्ध करून देणेबाबत**

**व**

**परीक्षांमधून वगळलेल्या प्रश्नांबाबत व एकाहून अधिक पर्याय योग्य असलेल्या प्रश्नांबाबत करण्यात आलेल्या कार्यवाही बाबत**

महाराष्ट्र राज्यातील बार्टी, टीआरटीआय, सारथी, महाज्योती आणि आर्टी या संस्थांच्या लाभार्थी गटांकरिता राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम २०२५- २६ संबंधित विविध योजनांच्या लाभार्थी निवडीकरिता सर्वकष धोरणांतर्गत सामयिक प्रवेश परीक्षांचे (Common Entrance Tests) आयोजन दि. १६ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२५ व दि. १७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत करण्यात आले होते. या परीक्षांमधील प्रश्न/उत्तरे संदर्भात answer key/response sheet आणि आक्षेप नोंदविण्यासाठीची सुविधा challenge portal द्वारे दि. ६ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर २०२५ व दि. १९ ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबर २०२५ पर्यंत उपलब्ध करून देण्यात आले होते.

प्राप्त आक्षेपांच्या पडताळणीअंती जे प्रश्न चुकीचे असल्याचे (Question is wrong or Ambiguous) आढळून आले असतील ते वगळण्यात येत असून ज्या batch/शिफ्ट मधील प्रश्नपत्रिकेतील प्रश्न वगळण्यात आला/आले असतील त्यांचे गुण (Obtained Marks) हे पुढे दिलेल्या सूत्रानुसार परिगणित केले जातील.

$$\textbf{Obtained Marks} = \frac{\textbf{Total marks received for each correct answer}}{\textbf{\textit{Highest Marks Possible after omission of Wrong Questions}}} \text{ X १००}$$

**(Pro Rata Score)**

तसेच, ज्या प्रश्नांच्या संदर्भात एकाहून अधिक पर्याय योग्य उत्तर दर्शवित असल्याचे आढळल्यास योग्य उत्तर दर्शविणारा कोणताही पर्याय उमेदवाराने निवडला असल्यास त्या उमेदवाराला सदर प्रश्नाचे गुण देण्यात येतील.

उमदेवारांना त्यांच्या निकालाची प्रत Result Web Copy द्वारे उपलब्ध करून देण्यात येईल ज्यामध्ये उमेदवाराचे वरीलप्रमाणे Obtained Marks तसेच Percentile Score (सामान्यीकृत गुण) यांचा अंतर्भाव असेल. परीक्षा निहाय अंतिम गुणवत्ता याद्या या सामान्यीकृत गुणांनुसार (Percentile Score) संबंधित संस्थेमार्फत प्रसिद्ध केल्या जातील. तरी सर्व उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरी/-

**व्यवस्थापकीय संचालक**
**अण्णा भाऊ साठे संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था (आर्टी),मुंबई**